**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

**दि.३ मार्च ते ८ मार्च २०२५ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.**

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४२ ■ शनिवार १ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


**बॉम्बे चष्माघर**

गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे

☎-235222,मो.9021853108

## दत्ता गाडेला अखेर नाट्यमय घडामोडीनंतर अटक

## पुणे बलात्कार प्रकरण; बारा मार्चपर्यंत पो.कोठडी

**पुणे, दि.२८- पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला अखेर अटक करण्यात आली आहे. दत्ता गाडेने स्वारगेट बस स्थानकावरील मशिवशाहीफबसमध्ये सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला होता. यानंतर तो फरार झाला होता. पोलिसांनी त्याचा कसून शोध घेतला आणि अखेर मध्यरात्रीच्या सुमारास गुनाट गावात नाट्यमय घडामोडींमध्ये तो सापडला. दरम्यान अटक केल्यानंतर त्याला कोर्टात हजर करण्यात आले असता त्याला बारा मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.**



पुणे बलात्कार प्रकरणी आरोपी दत्ता गाडेला शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती टी.एस. गायगोले यांच्यासमोर ही सुनावणी सुरु झाली. दरम्यान कोर्टात वकील आणि प्रसारमाध्यमांची खूप गर्दी झाली. त्यामुळे पोलिसांकडून गर्दी कमी करण्यास सुरुवात झाली. आरोपीच्या वतीने ॲड.वाजिद खान बाजू मांडली. दरम्यान न्यायमूर्तींनी जोपर्यंत सगळे लोक बाहेर जात नाहीत तोपर्यंत सुनावणी होणार नाही असे सांगितले. यानंतर वकिलांनी बाहेर जाण्यास नकार दिला. अखेर पत्रकारांना आत परवानगी दिली, मात्र वकिलांना बाहेर काढले त्यामुळे वकील चिडले.

सुनावणीदरम्यान तपास अधिकाऱ्याने प्रकरणाची संपूर्ण हकीकत सांगितली. आरोपीने ताई ताई म्हणून पिडीतेचा विश्वास संपादन केला. १५ वर्षांपासून आपण कंडक्टर म्हणून काम करत असल्याचे त्याने सांगितले आणि तिला बसकडे घेऊन गेला. बसमध्ये कोणीही प्रवासी नसल्याचे लक्षात आल्याने तिने बाहेर जाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने मारहाण करून खाली पाडले आणि अत्याचार केला. तक्रार दिल्यानंतर आरोपी दत्तात्रेय रामदास गाडे याला अटक केली अशी माहिती तपास अधिकाऱ्याने दिली.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता सखोल तपास करायचा आहे. मोबाईल आणि **(पान ४ वर)**

### पाकिस्तानमध्ये मशिदीत नमाज पठणावेळी बॉम्बस्फोट

इस्लामाबाद, दि.२८- पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात शुक्रवारी दुपारी नमाज पठणावेळी भीषण बॉम्बस्फोट झाला. या स्फोटामध्ये किमान तीन जणांचा मृत्यू झाला असून वीस जण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रांतातील नौशेरा भागात एका मशिदीमध्ये हा स्फोट झाला. नमाज पठणासाठी मोठ्या संख्येने लोक या मशिदीमध्ये एकत्र आले होते. त्याचवेळी हा स्फोट झाला. सुसाईड बॉम्बरकरही हा आत्मघाती स्फोट घडवून आणल्याची प्राथमिक माहिती स्थानिक पोलिसांनी दिली आहे. रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बॉम्बस्फोटाची घटना घडल्यानंतर तातडीने बचाव पथके घटनास्थळी दाखल झाले.

## शरद पवारांची शॅडो कॅबिनेट, नेत्यांकडे विभागवार जबाबदारी

## सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर काटेकोर लक्ष ठेवणार

**मुंबई, दि.२८- राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून शॅडो कॅबिनेटची निर्मिती करण्यात आली असून त्या माध्यमातून राज्य सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच पक्षाच्या नेत्यांवर विभागवार जबाबदारी देण्यात आली असून त्या नेत्यांना महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाची मुंबईत बैठक पार पडली. त्यामध्ये पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर चर्चा करण्यात आली.**



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीला पक्षाच्या सर्व आमदारांची आणि खासदारांची उपस्थिती होती. पक्ष वाढीसाठी काही प्रमुख नेत्यांवर जबाबदारी देण्यात आली आहे. जयप्रकाश दांडेगावकर, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रोहित पवार, एकनाथ खडसे, हर्षवर्धन पाटील यांच्यावर पक्षाने जिल्ह्यांची जबाबदारी दिली आहे. या नेत्यांनी प्रत्येक महिन्यात जिल्ह्यांचे दौरे करून आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जास्तीत जास्त तरुण चेहऱ्याला संधी देण्याची रणनीती आखण्यात आली आहे. जिथे रिक्त पद असतील तिथे पद भरली जाणार आहेत. पदाधिकारी बदलायची जर गरज वाटत असेल तर पदाधिकारी देखील बदलले जातील. पक्षाचे नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी नव्या उमेदीने कामाला लागण्याच्या सूचना शरद पवारांनी दिल्या आहेत. पुढच्या तीन महिन्यात महाराष्ट्र पिंजून काढा आणि त्याचा अहवाल द्या असे आदेश पवारांनी नेत्यांना दिले आहेत.

या बैठकीबाबत पक्षाचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, शरद पवारांच्या पक्षाच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय झाले. त्यामध्ये **(पान ४ वर)**



## चाकुचा धाक दाखवून लुटणाऱ्या दोघांना एलसीबीने केले गजाआड

**धुळे, दि.२८- मुंबई-आग्रा महामार्गाने पायी जाणाऱ्या इसमाला दुचाकीवरून येवून चाकुचा धाक दाखवून मोबाईल हिसकावून दोघे पळुन गेले होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोबाईल नेणाऱ्या दोघांना गजाआड केले आहे. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे.**

मोहाडी नगर पोलीस स्टेशनला दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी नोंदविलेल्या लुटीच्या या गुन्ह्याबाबत फिर्याद नोंदविण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि.श्रीराम पवार यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी संशयित गौरव ऊर्फ भंडाऱ्या लक्ष्मण अरदले (वय २०)रा. चितोड नाका, श्रीराम एसटीडी जवळ,धुळे व अभय अशोक झोटे (वय २३) रा.संबोधी नगर, चितोड रोड, धुळे यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ एकोणावीस हजार नऊशे नव्व्याण्णव रूपये किंमतीचा मोबाईल व पन्नास हजार रूपये किंमतीची दुचाकी असा एकुण एकोणसत्तर हजार नऊशे नव्याण्णव रूपये किंमतीचा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेला चाकु आढळून आला. ही कारवाई जिल्हा पोलीस **(पान ४ वर)**

### भरधाव वाहनाची धडक; एक ठार

धुळे, दि.२८- शिंदखेडा तालुक्यातील दभाषी गावाजवळ दुचाकीने जाणाऱ्या इसमाला भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने मागुन धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना घडली आहे.संजु गंगाराम भिल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिरपुर टेक भिलाटी येथील रहिवासी गोरख गंगाराम भिल (वय ३४) हे दुचाकीने मुंबई-आग्रा महामार्ग क्र.०३ दभाषी गावाजवळ तापी नदी पुलाकडे दि. २९ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास येत होते. त्यावेळी मागुन भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील गोरख भिल दुभाजकावर आदळल्याने गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

## भरधाव वेगातील दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक; एक जण ठार

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- भरधाव वेगातील दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक झाल्याने एक जण ठार तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची बोदवड गावाच्या वळणावर घडली. जखमीस उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरण विसरवाडी पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली होती.**

नवापूर तालुक्यातील नवापाडा येथील सुरेश धिरजी पाडवी (वय ४१) व त्यांचा मित्र रवि संभाजी वसावे हे दोघे दुचाकीने (क्र.एमएच ३९एएफ ६७०४) वडफळी येथे खडीचे पैसे देण्यासाठी जात होते. विसरवाडी ते नंदुरबार रस्त्याने मोटरसायकलीने (क्र. जीजे १९पी. २९६५) दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने सुरेश धिरजी पाडवी व रवी संभाजी वसावे या दोघांना विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू उपचारादरम्यान सुरेश धिरजी पाडवी यांचा मृत्यू झाला. तर रवी संभाजी वसावे हे जखमी असल्याचे त्यांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे पुढील उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल असून उपचार सुरु **(पान ४ वर)**

### हर्ष स्वस्त औषधी सेवा केंद्रचा आज शुभारंभ

धुळे, दि.२८-देवपूर दत्तमंदिर चौकातील काटे कॉम्प्लेक्स येथे दि.१ मार्च २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता हर्ष स्वस्त औषधी सेवा ॲण्ड जेनेरिक मेडिसीन स्टोअर्स चा भव्य शुभारंभ सिंधुबाई माणिकराव दाळवाले यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.शुभारंभ सोहळ्यासाठी धुळेकरांना उपस्थितीचे आवाहन रवींद्र दाळवाले, माजी नगरसेवक कांतीलाल दाळवाले, मदन दाळवाले, प्रसाद दाळवाले, पवन दाळवाले, रूद्रवीर दाळवाले, करण दाळवाले, राहुल दाळवाले, हर्ष दाळवाले यांनी केले आहे. हर्ष स्वस्त औषधी सेवा अँड जेनेरिक मेडिसीन स्टोअर्समधून रुग्णांसह त्यांच्या पालकांना सवलतीत औषध उपलब्ध होणार आहेत.



## प्रशांत कोरटकरवर कठोर कारवाई करा

## सकल मराठा समाजाचे पोलिसांना साकडे

**धुळे, दि.२८- नागपूर येथील प्रशांत कोरटकर या विकृत व्यक्तीवर महापुरुषांची बदनामी, धार्मिक भावना दुखावणे, सामाजिक तेढ निर्माण करणे व जीवे ठार मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी दखलपात्र गुन्हा दाखल करून त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन सकल मराठा ससमाजाच्यावतीने जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरेंना देण्यात आले आहे.**

प्रशांत कोरटकर, नागपूर या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दल गलिच्छ वक्तव्ये करून त्यांची बदनामी केली आहे. तसेच विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. तसेच समस्त मराठा समाजाला शिवीगाळ करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर या व्यक्तीने ब्राम्हणांच्या **(पान ४ वर)**

## धुळ्यात उद्या संडे ऑन सायकल रॅली नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**धुळे, दि.२८- संतुलित शारीरिक व्यायाम आणि खेळांच्या महत्वाबाबत जनतेला शिक्षित करण्याच्या उद्देशाने फिट इंडिया मिशन आणि शासकीय कार्यालय, स्वायत्त संस्था, पीएसयुएस यांच्या सहकार्याने रविवार २ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, वाडीभोकर रोड, धुळे येथे संडे ऑन सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी, युवक, युवती, नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा, श्रम आणि रोजगार मंत्री यांनी १७ डिसेंबर, २०२० रोजी फिट इंडिया सायकलींग ड्राईव्हचे उद्घाटन केले होते. त्यानंतर उत्साही सायकलींग ड्राइव्ह आता संडे ऑन सायकलही एक नियमित मोहीम बनली आहे. या मोहिमेत सुमारे २ लाख सायकलस्वरांच्या सहभागासह देशभरात १८०० हुन अधिक ठिकाणी **(पान ४ वर)**

### ट्रान्सपोर्ट कार्यालयातून रोकड, मोबाईल लंपास

धुळे, दि.२८- शहरातील अभय कॉलेज जवळील गौरव रोडवेज ट्रान्सपोर्टच्या कार्यालयाचे कुलुप तोडून अज्ञात इसमाने कार्यालयातील रोख रक्कम, मोबाईल व पाकीट असा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे.विकास बन्सीलाल पाटील यांनी दि. २७ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, गौरव रोडवेज ट्रान्सपोर्टच्या मागील लाकडी दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास प्रवेश केला. ट्रान्सपोर्ट कार्यालयातील पन्नास हजारांची रोख रक्कम, मोबाईल, पाकीट असा एकुण पंच्चावन्न हजार शंभर रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

## उच्च दाब विजेच्या धक्क्याने रंगकाम करणारा मजूर गंभीर

**सोनगीर दि.२८ (प्रतिनिधी)-**



**येथील राजकुमार नगर मध्ये घराला रंगकाम करताना घरा शेजारून गेलेल्या उच्च दाब विद्युत वाहिनीच्या धक्का लागून तरुण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या कॉलनी परिसरात दोन महिन्यात विजेचा धक्का लागण्याची ही दुसरी घटना घडली आहे. कॉलनी परिसरातून जाणारी उच्च दाब विद्युत वाहिनी इतरत्र हलवण्याची मागणी होत आहे.**

शुक्रवार दि.२८ रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास सोनगीर फाटा शेजारील राजकुमार नगर येथे राकेश देवरे यांच्या नवीन बांधकाम झालेल्या घराला मनोज प्रकाश वाघ (वय २५) रा.वरुड-भटाणे ता.शिरपूर हा युवक दोन साथीदारांसह रंगकाम करीत होता. यावेळी सदर घरासमोर असलेल्या उच्च दाब विद्युत वाहिनीला अनावधानाने त्याचा स्पर्श झाला. यामुळे जोराचा आवाज होऊन तो दूर फेकला गेला. यावेळी त्याला उपचारासाठी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉ. अभिषेक पवार यांनी प्राथमिक उपचार **(पान ४ वर)**

### शेतात ट्रॅक्टर उलटले चालक जागीच ठार

धुळे, दि.२८- धुळे तालुक्यातील न्याहळोद येथे सदोतीस वर्षीय ट्रॅक्टर चालक स्वत:च्या शेतात रोटा मारत असतांना ट्रॅक्टरवरील ताबा सुटल्याने ट्रॅक्टर उलटले त्याखाली चालक दाबाल जावून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोहेकॉ.आर.आर.वसावे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, न्याहळोद गावातील रूपेश रघुनाथ वाघ (वय ३७) हे स्वत:च्या शेतात दि. १७ मे २०२४ रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास ट्रॅक्टर क्र.एमएच १८/बीसी-४६६८ भरधाव वेगात रोटा मारत होते. यावेळी ट्रॅक्टरवरील ताबा सुटल्याने ट्रॅक्टर उलटून त्याच्या खाली रूपेश वाघ हे दबले गेल्याने गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला.

## तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या एलसीबीतील कर्मचाऱ्यासह पाच जणांवर धुळ्यात गुन्हा दाखल

**धुळे, दि.२८- देवपूर वलवाडी परिसरातील भिवसन नगरात राहणारा दर्शन चौधरी याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याने स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचारी निलेश पोतदारसह अन्य पाच जणांविरोधात चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

भुषण प्रकाश चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,पोलीस होण्याचे स्वप्न पाहणारा दर्शन चौधरीची भरतीसाठीची शारीरिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल येथे नियमित व्यायाम करत असे. जिल्हा क्रीडा संकुलालगत हर्बल लाईफ न्युट्रीशियन या नावाचे समीर वसंत खांडारकर यांचे दुकान आहे. या दुकानात दर्शन चौधरीचा सम ीर खांडारकर, निलेश कालिदास पोतदार, राहुल पाटील-भदाणे, शिवानी समीर खांडारकर व अरूण पाटील यांच्याशी परिचय झाला. ओळखीचा फायदा घेवून समीर खांडारकरने दर्शन चौधरीच्या घरी जावून शेअर मार्केटमध्ये मी पैसे गुंतवल्याने मला लाभ झाला तर तुम्हालाही त्याचा मोबदला देईल असे सांगितले. मात्र याला दर्शनच्या कुटूंबीयांनी स्पष्ट नकार दिला. ऑगस्ट २०२३ मध्ये निलेश पोतदार, समीर खांडारकर या दोघांनी भुषण व दर्शन या दोघांना क्रीडा संकुलाजवळ बोलवले. त्यावेळी दर्शन, भुषणसह त्यांचे वडील प्रकाश चौधरीही तेथे पोहचले. त्यावेळी पुन्हा समीरने पैसे गुंतवण्याबाबत तगादा लावला. तरी देखील प्रकाश चौधरींनी नाही म्हटले. दि.४ ऑगस्ट २०२३ रोजी समीर खांडारकर यास तीन लाख रूपये देवून स्टॅम्प बनवला होता. सहा म हिन्यांच्या मुदतीवर रक्कम देण्यात आली. काही दिवसांनी समीरने भुषण चौधरीला तीस हजार ऑनलाईन दिले. त्यानंतर स्टॅम्पवर करून दिलेला करार संपल्याने भुषण व दर्शन चौधरी या दोन्ही भावांनी निलेश कालिदास पोतदार, समीर खांडारकर, राहुल पाटील-भदाणे, शिवानी समीर खांडारकर व अरूण पाटील यांच्याकडे पैशांची मागणी केली. तेव्हा त्यांनी पैसे तर दिले नाहीत उलट सावकारी कायद्यासह बलात्काराचा गुन्हा दाखल करू असे धमकावले. **(पान ४ वर)**



## बेवारस मानसिक रुग्ण महिलेला डॉ.भाग्यश्री कुलकर्णींकडून मदत

**सोनगीर दि.२८ (प्रतिनिधी) - सोनगीर फाट्यावर काही दिवसांपासून एक मध्यमवयीन बेवारस मानसिक रुग्ण महिला फिरत होती. सदर महिलेला येथील सामाजिक कार्यकर्त्या व धुळे येथील स्नेहदीप प्रतिष्ठानच्या डॉ.भाग्यश्री कुलकर्णी यांनी मानसिक पुनर्वसन केंद्रात दाखल केले आहे.**

येथील सोनगीर फाट्यावर गेल्या आठ-दहा **(पान ४ वर)**

## महापालिकेने मनाई केलेल्या जागांवर व्यवसाय केल्यास कायदेशीर कारवाई; विक्रेत्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न

**धुळे, दि.२८- महानगर पालिकेतर्फे देवपूर येथील नेहरू चौक ते जी.टी.पी.स्टॉप या रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या फेरीवाल्यांना नवरंग पाण्याच्या टाकीजवळ व्यवसायासाठी तात्पुरती जागा उपलब्ध करून दिली आहे. रस्त्यालगत भाजी, फळे अथवा कोणत्याही वस्तुंची विक्री रस्त्यालगत करू नये असे मनपाने सांगितले असतांनाही काही विक्रेते पुन्हा त्याच ठिकाणी भाजी व इतर वस्तु घेवून बसतात. मनपा अशा विक्रेत्यांना कोणतीही नोटीस न देता सरळ कायदेशीर कारवाई करेल असा थेट इशारा आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी दिला आहे.**

शहरातील देवपूरात नेहरू चौक ते जी.टी.पी.स्टॉप पर्यंत आग्रा रोडवर फेरीवाल्यांना महापालिकेने मनाई केलेली आहे. नवरंग जलकुंभाजवळील जागेव्यतिरीक्त आग्रा रोडवर कोणतीही वस्तु, जिन्नस ठेवलेली, उभारलेली किंवा विक्रीसाठी वस्तु ठेवलेल्या आढळून आल्यास कोणतीही नोटीस न देता विना नोटीसीने महापालिका अधिनियम ानुसार काढून टाकण्याची कारवाई तसेच पुढील कायदेशीर कारवाईस संबंधित विक्रेता, व्यावसायिक जबाबदार राहील. असा इशारा मनपाच्या आयुक्त तथा प्रशासक दगडे-पाटील, सहा.आयुक्त किशोर सुडके यांनी फेरीवाल्यांना दिला आहे.

काही दिवसांपूर्वी मनपाच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख प्रसाद जाधव देवपूर जी.टी.पी.स्टॉप परिसरात मनपाने मनाई केलेल्या जागेवर पुन्हा अतिक्रमण करून भाजी विक्रेत्या **(पान ४ वर)**

## टवळाई येथे श्री गोरक्षनाथ बाबा मंदिर ट्रस्टच्या सहकार्याने यात्रोत्सवाची यशस्वी सांगता

**शहादा,दि.२८ (प्रतिनिधी) - तालुक्यातील टवळाई येथे महाशिवरात्रीनिमित्त गोरक्षनाथ भगवानची यात्रा भरते.**

या यात्रेनिमित्त मनोरंजनासाठी सोंगाड्या पार्टीचे आयोजन केले जाते. यावर्षी सलग तीन दिवस सोंगाड्या पार्टीचा कार्यक्रम होता. तसेच गावात सजवलेल्या तगतरावची प्रदक्षिणा घातली जाते. यावेळी भाविक भक्त नैवेद्य दाखवून मानलेले नवस फेडतात. यात्रेत खाद्य पदार्थ, खेळणी व संसारोपयोगी साहित्याची दुकाने सजली होती. यात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून म्ह-



सावद पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

यावेळी श्री गोरक्षनाथ बाबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बापू तुमड्या वाघ, उपाध्यक्ष प्रवीण उद्देसिंग बागले, सचिव मोग्या बापू वाघ, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वाघ, पोलिस पाटील मोग्या पाडवी तसेच ग्रामस्थांनी यात्रोत्सवाचे यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

**Consulting Chambers**

**with following Amenities available on Rental basis**

1) well Furnished
2) Attractive Reception Hall
3) Lan
4) WiFi
5) EPBX
6) CCTV Camera
7) Seprate MSEB meter
8) Corporate Ambience
9) Attached Toilets

**Venue : Meera Hospital**

station Road, Dhule

Phone : 7972588499

visiting time : 10 am to 12 noon

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -78,400 रु.+3% GST

सोने- 24 K -85,600 रु.+3% GST

चांदी- 97,500 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

दैनिक **आपला महाराष्ट्र**

मालकी हक्कासंबंधी व इतर माहितीबाबत

**निवेदन**

फार्म नं.४ (नियम ८ पहा)

१) प्रकाशन स्थळ– आपला महाराष्ट्र कचेरी जनशक्ती इमारत, वीर सावरकर मार्ग, धुळे

२) प्रकाशन काळ – दैनिक

३) मुद्रक, प्रकाशक, मालक – हेमंत सुधाकर मदाने

४) भारतीय नागरीक आहे काय ?– होय

५) पत्ता– जनशक्ती इमारत, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१

६) संपादकाचे नांव – हेमंत सुधाकर मदाने

मी हेमंत सुधाकर मदाने याद्वारे जाहिर करतो की, वरील माहिती माझ्या समजूतीप्रमाणे व माहितीनुसार खरी आहे.

ता. १/३/२०२५

**हेमंत सुधाकर मदाने**

## पान १ वरुन

### पुणे बलात्कार प्रकरण

कपडे जप्त करायचे आहेत. त्याची वैद्यकीय तपासणी करायची आहे. इतर आणखी गुन्हे केले आहेत का? त्याचे कोणी साथीदार आहेत का? तो फरार असताना कोणाच्या संपर्कात होता. या सगळ्याचा तपास करायचा आहे. यासाठी १४ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी अशी मागणी सरकारी वकिलांकडून करण्यात आली. आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्या विरोधातील ६ पैकी ५ गुन्ह्यात फिर्यादी महिला आहेत. त्यामुळे त्याचा महिलांविषयीचा दृष्टिकोन लक्षात येतो असाही युक्तिवाद त्यांनी केला.

दरम्यान आरोपीच्या वकिलांनी ही सगळी घटना बनावट असल्याचे सांगितले. महिला स्वतःहून बस मध्ये गेली आहे. ती आधी बसमध्ये चढली. परस्पर संमतीने हा प्रकार घडला आहे, त्यामुळे तो बलात्कार घडत नाही. त्याला तपासकामी २ दिवसांची पोलीस कोठडी पुरेशी आहे असा युक्तिवाद त्यांनी केला. आरोपी विरोधात दाखल गुन्ह्यात शिक्षा झालेली नाही त्यामुळे सराईत गुन्हेगार म्हणता येणार नाही. आरोपीच्या कुटुंबियांना त्रास होत आहे. केवळ २ दिवस पोलीस कोठडी देण्यात यावी असे दुसऱ्या वकिलांनी सांगितले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकून कोर्टाने गाडेला बारा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### शरद पवारांची शॅडो कॅबिनेट

सरकारच्या पहिल्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवणारी टास्क टीम तयार करण्यात आली. तसंच विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून ७-८ मार्चपासून या नेत्यांना विभागनिहाय दौरे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय हा महाविकास आघाडीच्या समन्वय समितीची बैठक होईल. या अधिवेशनात विरोधी पक्ष नेतेपदाबाबत जो प्रस्ताव दिला जाईल त्यावर सरकारनेही विचार करावा असा ठराव या बैठकीत मांडण्यात आला आहे.

**युवक अध्यक्षपदी फहाद अहमद**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक राष्ट्रीय अध्यक्षपदी फहाद अहमद यांची निवड करण्यात आली आहे. फहाद अहमद यांनी नुकतीच पक्षाकडून अणुशक्तीनगर विधानसभेची निवडणूक लढली होती. फहाद अहमद हे अभिनेत्री स्वरा भास्कर यांचे पती आहेत. त्यांची युवक राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याची माहिती पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली.

**कोणाकडे कोणती जबाबदारी?**

मराठवाडा- राजेश टोपे आणि जयप्रकाश दांडेगांवकर, विदर्भ- राजेंद्र शिंगणे आणि अनिल देशमुख, कोकण- जितेंद्र आव्हाड आणि सुनिल भुसारा, प. महाराष्ट्र- हर्षवर्धन पाटील, उत्तर महाराष्ट्र- हर्षवर्धन पाटील.

### दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक

आहे. अपघाताची माहिती मिळताच विसरवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, हे कॉ. प्रशांत पाटील, हेकॉ. लिनेश पाडवी यांनी धाव घेतली. घटनास्थळी मयताच्या नातेवाईकांनी आक्रोश व्यक्त केला. विसरवाडी पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून तपास हे कॉ. अरुण कोकणी, पोकॉ. रामसिंग ठाकरे करीत आहेत.

### चाकुचा धाक दाखवून लुटणाऱ्या..

अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. श्रीराम पवार, सपोनि. श्रीकृष्ण पारधी, पोउनि.अमरजीत मोरे, सपोउनि. संजय पाटील, शाम निकम, पोहवा.पंकज खैरमोडे, धर्मेंद्र मोहिते, मुकेश वाघ, सुरेश भालेराव, शशिकांत देवरे, सुशिल शेंडे, पोकॉ.अमोल जाधव, राजीव गिते यांनी केली.

### धुळ्यात उद्या संडे ऑन सायकल रॅली

ती झाली आहे. या मोहीमेची मन की बात च्या ११७ व्या भागात पंतप्रधान महोदयांनी देखील मान्यता दिलेली असुन फिटनेस आणि आरोग्य संवर्धनाचे महत्व अधोरेखीत केले आहे. रविवार २ रोजी धुळ्यात होणाऱ्या संडे ऑन सायकल रॅली जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथुन सुरु होईल. ती गोंदुर विमानतळाजवळ समाप्त होईल. तरी या रॅलीत सर्व शासकीय/ निमशासकीय कर्मचारी, युवक/युवती, नागरिक, स्वायंत्त संस्था यांनी फिटनेस का डोस, आधा घंटा रोजहे घोषवाक्य वापरुन दैनंदिन शारीरिक हालचालीमध्ये सहभागी होवून तंदुस्त रहावे, याकरिता फिट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत चालु असलेल्या मोहीमा आणि कार्यक्रमात सहभागी होवुन तसेच फिट इंडिया पोर्टलवर नोंदणी करुन सहभागी व्हावे. तसेच कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर सहभाग प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. तरी जास्तीत जास्त नागरीकांनी २ मार्च रोजी होणाऱ्या संडे ऑन सायकल या रॅलीत सहभागी व्हावे. असे आवाहन टिळे यांनी केले आहे.

### रंगकाम करणारा मजूर गंभीर

केले. पुढील उपचारासाठी दाखल करण्यात त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, २८ डिसेंबर रोजी याच कॉलनीत राहणाऱ्या तेजबहादुर विश्वकर्मा यांच्या लकी या बारा वर्षीय मुलाला पतंग उडवताना याच उच्च दाब विद्युत वाहिनीचा धक्का बसून तो गंभीर जखमी झाला होता. यामुळे त्याला कायमचे अपंगत्व आले आहे. सदर विद्युत वाहिनी इतरत्र स्थलांतरित करावी अशी मागणी या भागातील रहिवाशांनी केली आहे.

### प्रशांत कोरटकरवर कठोर कारवाई करा

शासनात तुम्ही काम करत आहे हे लक्षात ठेवा. बाजीप्रभू नसते तर तुमचा महाराज जिवंत नसता. तुमचे महाराज पळून गेले. जेम्स लेनचे पुस्तक वाचा, लोकांना सांगा जेम्स लेनने काय म्हटले आहे, व्हू इज बायोलॉजिकल फादर ऑफ शिवाजी हे लोकांना सांगा. ब्राम्हणांना कमी समजू नका. तुम्हाला ब्राम्हणांची ताकद दाखवतो, मग तुम्ही कितीही मराठे एकत्र करा. छत्रपती शिवाजी महाराजांना देशापर्यंत पोहोचवणारा भालजी पेंढारकर हा ब्राम्हण होता. नाहीतर तुमचा छत्रपती कुठे गेला असता माहित पडलं नसतं रेकॉर्ड कर तुझ्या बापाला. तसेच अश्लिल शब्दांत वाद घातला. सदर ऑडीओ कॉल रेकॉर्डींग इंद्रजित सावंत यांच्या वॉलवर उपलब्ध आहे. राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि कठोर कारवाई करावी. अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सकल मराठा समाजाचे भानुदास बगदे, विनोद जगताप, निंब मराठे, राजेंद्र काळे, हरिचंद्र वाघ, भानुदास चौधरी, जगन ताकटे, दीपक रौंदळ, आबा कदम, नाना कदम, अशोक बाबर, सुनील वरपे, ॲड.नितीन पाटील, वामन मोहिते, कैलास वाघारे, अर्जुन पाटील, डी.यू. पाटील, प्रफुल्ल माने, संतोष लकडे, उल्हास पाटील, के.डी. जाधव यांनी दिला आहे.

### तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या..

शिक्षण पुर्ण झाल्यानंतर दर्शन पोलीस भरतीचे प्रयत्न करतांना आपले भवितव्य धोक्यात येईल या चिंतेत असायचा. या पाचही जणांच्या जाचाला कंटाळून दर्शन चौधरीने दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथील शेतातील घरात दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी मेहुणबारे पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. दर्शनच्या आत्महत्येच्या घटनेनंतर त्याचा मोबाईल भुषण चौधरीने हाताळला असता त्यात निलेश पोतदार सोबत झालेली चॅटींग समोर आली. त्यात निलेश पोतदार व समीर खांडारकर यांनी पैसे परत केले पाहिजे अन्यथा माझ्यावर आत्महत्येची वेळ येईल. त्याचप्रमाणे आमच्यावर खरच गुन्हे दाखल होतील का ? असे संदेश दिसून आले. यामुळे निलेश पोतदार, समीर खंडारकर, राहुल पाटील, शिवानी खंडारकर व अरूण पाटील या पाचही जणांनी दिलेल्या त्रासामुळेच दर्शनने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणी जळगाव जिल्हा मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३५१(२), ३५१(३),३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील सखोल तपास पोलीस उपनिरिक्षक विकास शिरोळे करत आहेत.

## पान १ वरुन

### डॉ.भाग्यश्री कुलकर्णीकडून मदत

दिवसांपासून एक मध्यमवयीन अनोळखी मानसिक रुग्ण महिला फिरत होती. सदर महिला हिंदी, इंग्रजी भाषा बोलत होती व ती आपण नेपाळ (जनकपुर) येथून आलेलो आहोत असे सांगत होती. तिच्या वर्तणुकीवरून सदर महिला गंभीर मनोरुग्ण असल्याचे दिसत होते. याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते मा. ग्रा.सदस्य किशोर पावनकर, मयूर मोरे, प्रशांत देशमुख, संदीप गुजर, रतन माळी, भूषण बडगुजर, राकेश पाटील यांनी धुळे येथील स्नेहदीप प्रतिष्ठानच्या डॉ.भाग्यश्री कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधला. डॉ.कुलकर्णी यांनी स्वखर्चाने रुग्णवाहिका आणली व सदर महिलेची आस्थेवायीकपणे विचारपूस केली. परंतु सदर महिला अधिक काही बोलत नव्हती. यामुळे ही महिला गंभीर स्वरूपाची मनोरुग्ण असल्याचे खात्री पटल्याने डॉ.कुलकर्णी यांनी सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने सदर महिलेला रुग्णवाहिकेत बसवले व तिला चोपडा येथील मानव विकास केंद्रात दाखल करण्यात आले. डॉ.भाग्यश्री कुलकर्णी ह्या काही वर्षांपासून मनोरुग्णांच्या पुनर्वसनाचे सामाजिक कार्य करत आहेत. यापूर्वी त्यांनी येथील रथ चौकात फिरणाऱ्या एका अनोळखी मनोरुग्ण महिलेला चोपडा जि.जळगाव येथील मानव विकास केंद्र येथे पाठवून उपचारांची सोय करून दिली. तसेच रस्त्याने फिरणाऱ्या मानसिक व शारीरिक दृष्ट्या आजारी असणाऱ्या अनोळखी रुग्णांना व्यवस्थित उपचार करण्यात येतात. सदर रुग्णांना गतस्मृती परत आल्यावर असे रुग्ण स्वगृही परत पाठवण्याची व्यवस्था सदर संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सामाजिक कार्यकर्ते व डॉ.कुलकर्णी यांच्या कार्याचे येथे कौतुक होत आहे.

### विक्रेत्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न

महिलांना हटकले असता त्यांनी अरेरावी केली. शासकीय कामात अडथळा आणल्याने दोन्हीही महिलांवर अतिक्रमण विभागाच्या जाधवांनी देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. मनपाने रहदारीस अडथळा ठरणाऱ्या भाजी विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपात नवरंग पाण्याच्या टाकीजवळ जागा उपलब्ध करून दिल्यानंतरही काही मुजोर विक्रेते पुन्हा त्याच ठिकाणी व्यवसायासाठी आग्रही आहेत. मनमानी करणारे विक्रेते व व्यावसायिकांवर कठोर कायदेशीर कारवाईचे पाऊल महापालिकेने उचलले आहे.

## ब्राह्मण समाजाचा पाणपोईचा उपक्रम स्तुत्य : आमदार अनुप अग्रवाल

**धुळे, दि.२८- शिवाजी रोडवरील कालिका माता देवी मंदिरासमोरील श्री भगवान परशुराम चौकात आमदार अनुप अग्रवाल यांच्या हस्ते जार पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला.**




याप्रसंगी भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, नारायण बुवा समाधी मंदिराचे मठाधिपती भाऊ उर्फे दीपक रूद्र महाराज, विजय पाच्छापूरकर, निवृत्त अभियंता कैलास शिंदे, ठेकेदार प्रसाद जोशी, व्ही.एन. भादलीकर, शिप्रसाद शर्मा, दुर्गाचरण शर्मा आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. चौकात गेल्या चार वर्षापासून उन्हाळ्याचे चार महिने थंडगार जारचे पाणी ब्राह्मण समाजातील देणगीदारांकडून उपलब्ध करून दिले.त्याचा शुभारंभ आज आमदार अग्रवाल यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी आयोजनासाठी श्री भगवान परशुराम चौक समितीचे अनिल दिक्षित, रमेश कुलकर्णी, भूषण जोशी, शेखर कुलकर्णी, जयेश वावदे, पी.एन.कुलकर्णी आदींकडून परिश्रम घेतले. याप्रसंगी प्रदीप जोशी, दत्ता कुलकर्णी, रविंद्र टाकणे,नलिनी कुलकर्णी, रेखा कुळकर्णी, प्रमोद कुलकर्णी, पी.आर. जोशी, दिक्षित मॅडम, वैद्य मॅडम यांच्यासह समाजबांधव, पुरोहित उपस्थित होते. सूत्रसंचालन राकेश गाळणकर यांनी केले. या उपक्रमासाठी समाजातील अनेकांचे सहकार्य लाभले आहे. त्यांचाही याप्रसंगी समितीतर्फे सत्कार करण्यात आला.

## जखमी रुग्णासोबत असलेल्या तरुणांना रुग्णवाहिकेवरील डॉक्टरकडून मारहाण

**सोनगीर दि.२८ (प्रतिनिधी)- विद्युत शॉक लागून जबर जखमी झालेल्या युवकाला सोनगीर ग्रामीण रुग्णालयातून जिल्हा रुग्णालयात हलवत असताना रुग्णवाहिकेवरील डॉक्टरने रुग्णासोबत असलेल्या दोन तरुणांशी असभ्य वर्तणूक करत एकास मारहाण करून हाकलून लावले. या संतापजनक प्रकाराची चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, दि.२८ रोजी दुपारी तीन वाजता येथील राजकुमार नगर मधील एका घरास रंगकाम करत असताना रंगकाम करणाऱ्या तरुणाला उच्च विद्युत दाब वाहिनीचा जोरदार धक्का बसल्याने तो जबर जखमी झाला. विजेच्या धक्क्याने त्याचे शरीर भाजले. त्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, त्याची प्रकृती गंभीर असल्याने ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याला त्वरित जिल्हा रुग्णालयात घालवण्याबाबत नातेवाईकांना सूचित केले. नातेवाईकांनी १०८ रुग्ण वाहिकेला फोन करून बोलावले. नरडाणा ता. शिंदखेडा येथील रुग्णवाहिका डॉक्टरसह येथे उपस्थित झाली. यावेळी सदर जबर जखमी रुग्ण गंभीर भाजल्याने अस्वस्थ होऊन डॉक्टरांना सलाई लावू देत नव्हता. यावेळी नरडाणा येथून आलेल्या रुग्णवाहिकेतील डॉक्टरने नातेवाईक व तेथे उपस्थित असलेल्यांना सदर रुग्ण जर सलाईन लावून देत नसेल तर त्याला कशाला दवाखान्यात घेऊन जाऊ. येथेच त्याचे बरे वाईट होऊन जाऊ द्या. असे बोलल्यामुळे उपस्थित लोक सदर डॉक्टरवर चिडले व यावेळेस डॉक्टर व उपस्थितांमध्ये जोरदार वादावादी झाली. दरम्यान हा वाद मिटून सदर अस्वस्थ रुग्णाला घेऊन रुग्णवाहिका धुळ्याकडे मार्गस्थ झाली. ही रुग्णवाहिका सोनगीर फाट्याच्या पुढे गेल्यावर रुग्णवाहिकेतील डॉक्टरांनी सदर रुग्णवाहिका थांबवली व मागील बाजूस येऊन रुग्णासोबत असलेल्या दोघा तरुणांना शिवीगाळ करत तुम्ही कोणत्या जातीचे आहात ते पहिले सांगा व माझ्या पाया पडा. ग्रामीण रुग्णालयात झालेल्या प्रकाराची माफी मागा. तरच मी रुग्णवाहिका पुढे नेतो. अशी धमकी भरली. यावेळी रुग्णवाहिकेत उपस्थित असलेले प्रफुल्ल मोरे व प्रवीण मोरे हे दोघे युवक गर्भगळित झाले व डॉक्टरांच्या गयावया करू लागले. पण तरीही डॉक्टरला दयामया आली नाही. डॉक्टरने प्रफुल मोरे याला मारहाण करायला सुरुवात केली. मरहाणी पासून वाचण्यासाठी प्रफुल घटनास्थळावरून पळून गेला तर प्रवीण मोरेला डॉक्टरने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली व रुग्णवाहिका पुढे मार्गस्थ केली. सदर प्रकार प्रवीण मोरे यांनी कथन केला असून डॉक्टरांच्या या कृत्यामुळे संताप व्यक्त होत आहे व झाल्या प्रकाराची चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

||अभिष्टचिंतन||
१ मार्च
इंजि.मा.श्री.विलास यशवंत मोरे
से.नि.उप कार्य अभियंता
आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!




शुभेच्छुक
दिनेश शार्दूल - मा. नगरसेवक, मनपा, धुळे
दिपक शेलार - मा. नगरसेवक, मनपा, धुळे
पंडित मिस्तरी - कार्याध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
दिंगबर मिस्तरी - सेक्रेटरी, सु.स. सेवा मंडळ
दिपक आहिरे - माजी अध्यक्ष, बिल्डर असो, धुळे
इंजि.दिनेश कुवर - उपाध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
राजेंद्र मोरे - से.नि. सहा पो. उपनिरीक्षक
नितीन कापडीस सर - सचिव, श्री विश्वकर्मा फाउं.
निलेश सुर्यवंशी (मामा) - सदस्य, श्री विश्वकर्मा फाउं.
इंजि.विजय शेलार - खजिनदार, सु.स. सेवा मंडळ
सतिष खैरनार - सदस्य, श्री विश्वकर्मा फाउं.
मधुकर हिरे - संघटक, श्री विश्वकर्मा संस्था, धुळे
शुभेच्छुक - मैत्री ग्रुप व प्रभु विश्वकर्मा समाज समन्वय समिती, धुळे.

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी वेटर/हेल्पर पाहिजेत.
पगार : १०,०००/- ते १२,०००/-
समक्ष भेटा!
अन्नपूर्णा
जलगाववाला मावा कुल्फी
म.गांधी चौक, धुळे

**पाहिजेत**
रेडीमेड दुकानासाठी अनुभवी सेल्समन, हेल्पर, अल्टर कामासाठी टेलर पाहिजे.
सेलिब्रेशन मेन्स वेअर
आग्रारोड, धुलिया
9421525774

**पाहिजेत**
DTP opretor कॉम्प्युटरचे ज्ञान व कोरल software ची माहिती असलेली व्यक्ती पाहिजे.
Bio Data व पगाराची अपेक्षेसह समक्ष भेटणे!
जिनेश कमलेश गांधी
गांधी किचन्स,
c/o भारत ऑटो कॉर्पोरेशन, पारोळा रोड, प्रकाश सिनेमा समोर, धुळे

**पाहिजेत**
किडस् वेअर करिता अनुभवी सेल्समन त्वरित लावणे आहेत. आकर्षक पगार दिला जाईल.
Blushh KIDS WEAR
आग्रारोड, धुळे
9422786143

**- पाहिजेत -**
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**ड्रायव्हर पाहिजेत**
बोलेरो पिकअपसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. समक्ष भेटा!
अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी (कॉर्नरची दुकान)
आग्रारोड, म.गांधी चौक, धुळे
8432349007

**शेती विकणे आहे**
मोघण शिवारातील ३ एकर बागायती शेती योग्य दरात विकणे आहे
-: संपर्क :-
9420851253

**पाहिजे**
अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे.
-: संपर्क :-
9823833108
8788637592

**विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे. शिव बसंत अपार्टमेंट, दिप आरती पेट्रोल पंपमागे, मोहाडीरोड, धुळे
-: संपर्क :-
9921694016

**घर विकणे आहे**
चार मजली (RCC) उत्तरमुखी सदर बाजार पेठेतील घर 16x24
ग.नं.२, धुळे
-: संपर्क :-
9422788390

**कार्टून पुठ्ठा**
रु.१६.०० प्रति किलो बंडल
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड
भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
होजिअरी दुकानासाठी होतकरु माणसे पाहिजेत.
हेल्पर-३, सेल्समन-१
वय २० ते ३० पर्यंत
मोहनलाल दामोदरलाल
जैन मंदिरासमोर, ग.नं.२, धुळे
9422287153
9404891061

**शेती विकणे आहे**
वारुड, कमखेडा शिवारातील (शिंदखेडा तालुका) शेती विकणे आहे. (विहीरी सहीत)
-: संपर्क :-
9209915299

**पाहिजेत**
फोटोशॉप/व्हिडीओ एडिटींग/न्यूज रिडर/ व्हिडीओग्राफी/प्रॉडक्ट फोटोग्राफी, पार्टटाईम/ फुलटाईम/Tally operator
माता हिंगलाज न्यूज चॅनल
ग.नं.४, धुळे
7030966995
9422286386

**स्टेशनरोड प्लॉट विकणे**
स्टेशनरोड व जमनागिरी रोड येथील प्लॉट विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगर, वल्लभ नगर, महावीर सोसायटी, विशाल नगर येथील लहान मोठे प्लॉट विकणे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**ऑफिस भाड्याने देणे**
गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
लेडीज वेअर शोरुमसाठी अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत.
दिया
ग.नं.२, नवग्रही, हॉटेल प्रियासमोर, धुळे

**पाहिजेत**
मेडीकल होलसेल दुकानामध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) अकौन्टंट
३) सेल्समन बाहेरगावासाठी
३) मदतनिस/हेल्पर
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975

**पाहिजेत**
अनुभवी व्हेज, नॉनव्हेज कारागीर, तंदूर कारागीर, वेटर/ हेल्पर पाहिजेत.
-: संपर्क:-
8007124449

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणूस, सेल्समन, हेल्पर, हमाल पाहिजेत.
सुपर इलेक्ट्रीक ॲन्ड लाईट हाऊस
३०८०, जमनालाल बजाज रोड, धुळे
9403427728
9226324664
9405170901

**पाहिजेत**
मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
बॅक ऑफीस/रिसेप्शनिस्ट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १२००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

**पाहिजे**
रेडीमेड दुकानाचे कामासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. प्रत्यक्ष भेटा!
महावीर ड्रेसेस
फुलवाला चौक, आग्रारोड, धुळे

५७ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer Panasonic LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV  HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०